# विशेष विवाह् कायदा,1954 अन्वये विवाह् संपन्न करणे

## अ. विशेष विवाह् कायदा,1954 अन्वये विवाह् संपन्न करणेसाठी पक्षकारांकडून करावयाची कार्यवाही-

1.विवाहातील पक्षकारांनी विवाह अधिकारी यांना उक्त अधिनियामातीलअनूसूची 2 मध्ये विहित केलेल्या नोटीसच्या नमून्यात नोटीस देणे

2.विवाहातील पक्षकारांनी व तीन साक्षीदारानी विवाह अधिकारी यांना विवाह् संपन्न होणूपूर्वी उक्त अधिनियामातील अनूसूची 3 मध्ये विहित केलेल्या घोषणापत्राच्या नमून्यात घोषणापत्र देणे

3.विवाह संपन्न करण्यास, विवाह अधिका-याने नकार दिल्यास,विवाहातील एक पक्षकार त्या नकाराच्या आदेशाविरुध्द विवाह अधिका-याचे कार्यालय ज्या जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात अंतर्भूत होत असेल,त्या जिल्हा न्यायालयामध्ये अपील करेल

## ब. विशेष विवाह् कायदा,1954 अन्वये विवाह् संपन्न करणेसाठी विवाह् अधिका-याकडून करावयाची कार्यवाही-

1. नोटीस प्राप्त होताच,विवाह् नोटीस पुस्तकात अशी नोटीसची खरी प्रत म्हणून नोंद करेल

2.तदनंतर असे विवाह् नोटीस पुस्तक, फी विना, सर्वासाठी पाहणीसाठी खुले करेल

3.अशी नोटीस त्याच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करेल

4.विवाहातील पक्षकारापैकी एक पक्षकार जर त्यांच्या कार्यक्षेत्रात कायमस्वरूपी रहात नसल्यास, असा पक्षकार ज्या विवाह अधिका-याच्या कार्यक्षेत्रात रहात असेल,त्या विवाह् अधिका-याकडे नोटीसची प्रत वर्ग करेल

5.नोटीस प्रसिध्द केल्यापासून 30 दिवसात विवाह् संपन्न करणेस आक्षेप आल्यास, ते आक्षेपाचे स्वरूप लेखी स्वरूपात नोंदवतील

6.आक्षेपाच्या तारखेपासून 30 दिवसाच्या मर्यादत आक्षेपासंदर्भात चौकशी करेल

7.चौकशी अंती विवाहास प्रतिबंध नसल्याचे त्याचे समाधान झाल्यास 30 दिवसांनंतर विवाह् संपन्न करेल

8.चौकशी अंती आक्षेपात तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास, ते विवाह् संपन्न करण्यास नकार देतील.

9.विवाह् संपन्न करणेस नकाराच्या आदेशाविरुध्द केलेल्या अपीलामध्ये जिल्हा न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे तो कार्यवाही करेल

10.आक्षेप न आल्यास किंवा आक्षेपाची चौकशी अंती प्रतिबंध करण्याचे कारण नसल्याचे त्यांचे निदर्शनास आल्यास विवाह् संपन्न करुन विवाह् प्रमाणपत्र देईल